संदर्भ १. श्री. पी. एन. खुपसे, वाहन चालक, यांचा दिनांक ०८/१२/२०२५ रोजीचा रिपोर्ट व त्यावरील आदेश.
२. लेखा व वित्ता विभाग जिल्हा न्यायालय, बीड यांची दि. ११/१२/२०२५ ची टिपणी व त्यावरील आदेश
३. मोटार वाहन निरिक्षक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांचा तपासणी अहवाल
४. मा. जिल्हा न्यायालय खरेदी समिती बीड, बैठकीचा वृत्तांत,दिनांक १६/१२/२०२५

**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**
**(लेखा व वित्त विभाग)**
**जाहीर—निवीदा**
**जावक क्रमांक : 13712/२०२५**
**दिनांक :— 16/१२/२०२५**

उपरोक्त विषयी आपणांस मा. जिल्हा न्यायालय, खरेदी समिती बीड यांच्या आदेशावरुन कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांचे मालकीच्या व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, साहेब यांच्याकडे वापरात असलेले शासकीय वाहन क्रमांक MH23 BC 4923 या वाहनासाठी Bridgestone या कंपनीचे 185/65, R15, 6 I साईझचे एकूण ०४ (चार) टायर खरेदी व Wheel Allingment Balancing करून देणे सहीत अधिकृत विक्रेत्याकडुन निवीदा मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रके विक्रेते, पुरवठादारांनी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड, जिल्हा न्यायालय, बीड या पत्त्याचे बंद पाकीटावर ''टायर खरेदीचे निवीदा" असा उल्लेख करुन **मा. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांचेकडे दिनांक १९/१२/२०२५ चे कार्यालयीन वेळेत ५:३०** वाजेपर्यंत सादर करावी, त्यांनतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

**अटी व शर्ती :**

१. दरपत्रकातील दर सर्व करांसहित नमुद करणे आवश्यक आहे.

२. दरपत्रक सादर करतेवेळी सदर दर (Bridgestone) टायर कंपनीचेच असावेत, याची दक्षता घ्यावी.

३. दरपत्रक सादर करतेवेळी त्यात कुठल्याही पूर्व अटी व शर्तींचा उल्लेख नसावा.

४. टायरची साईझ 185/65, R15, 6 I Bridgestone आवश्यक आहे.

५. एकदा सादर केलेल्या दरपत्रकात नंतर कुठल्याही प्रकारचा बदल करता

येणार नाही, याची नोंद घ्यावी.

६. अभिकर्त्यास कुठल्याही प्रकारची आगावू रक्कम या कार्यालयातर्फे अदा केली जाणार नाही, याची नोंद घेवूनच दरपत्रक सादर करावे.

७. निविदेदरम्यान कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन वाद–विवाद उद्‌भवल्यास त्याचे कार्यक्षेत्र हे बीड न्यायिक जिल्हा राहील.

८. टायरचा पुरवठा केल्यानंतर अभिकर्त्याने त्याचे देयक रितसर या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे व त्यानंतरच नियमाप्रमाणे देयक अदा करण्यात येईल, तत्पूर्वी देयक अदा केले जाणार नाही.

16/11/2025

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, बीड

प्रतिलिपी : —

१. निता इंटरप्राजेस, विप्र नगर, बीड
२. वेदांत टायर्स, अशोका हॉटेल जवळ, जालना रोड, बीड
३. व्यंकटेश टायर्स सर्व्हिस, जालना रोड, बीड
४. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड यांना देवुन सुचित करण्यात येते की, सदरील निविदा न्यायालयाच्या नोटीसबोर्डवर डकविणेबाबत संबंधितास सुचित करावे व कार्यपुर्ती अहवाल या न्यायालयास सादर करावा.
५. सहायक अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, बीड यांना देवुन सुचित करण्यात येते की, सदरील निविदा न्यायालयाच्या नोटीसबोर्डवर डकविणेबाबत संबंधितास सुचित करावे व कार्यपुर्ती अहवाल या न्यायालयास सादर करावा.
६. संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, बीड यांना सुचीत करण्यात येते की, सदरील निवीदा जिल्हा न्यायालय बीड च्या वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात यावी.
७. नोटीस बोर्ड, जिल्हा न्यायालय, बीड
८. कार्यालयीन संचिका

16/11/2025

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, बीड

D:\MAULI 19.11.24\beed\tipani\nivida tipni.odt